पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड

चिंचवड – ४११ ०१९

**ई-निविदा सूचना क्र.०१ सन २०२४-२५**

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडकरीता कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडेतत्त्वावर पुरवठा करणे बाबत १२ महिने कालावधीकरीता निविदा मागविणेत येत असून इच्छूक ठेकेदारांनी निविदा दर देताना GST वगळून दर द्यावेत. GST वेगळा दिला जाईल.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | निविदा र. रू. | बयाणा र.रू. | अनामत र.रू. | कामाचा कालावधी | निविदा फॉर्म फी परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडकरीता कार्यालयीन कामकाजासाठी तीन स्विफ्ट डिझायर अथवा तत्सम (A/C) व एक इनोव्हा क्रिस्टा (A/C) वाहने भाडेतत्त्वावर पुरविणे बाबत.. (GST वगळून दर द्यावेत.) | ३३,८६,०००/- | ३३,८६०/- | १,६९,३००/- | १२ महिने | ३११९/- +१८% GST (५६२/-) ३६८१/- |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदा उपलब्ध कालावधी | दि.०२/१२/२०२४ ते दि.१७/१२/२०२४ |
| २ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि.१७/१२/२०२४ दुपारी ३.०० पर्यंत |
| ३ | निविदा उघडणेचा दिनांक | दि.१८/१२/२०२४ |

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री http:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सूरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती http:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support.eproc@nic.in अथवा help Desk Number – 0120-4200462, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.**
**चिंचवड – ४११ ०१९**

जाहिरात क्र.०१
क्र.पी.सी.एस.सी.एल/८/कावि/४३५/२०२४
दि.०२/१२/२०२४

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड

चिंचवड – ४११ ०१९

**ई-निविदा सूचना क्र.०१ सन २०२४-२५**

**निविदा फॉर्म**

---

बयाणा रक्कम रूपये – _______________

बँकेचे नाव – ______________________

दिनांक - / /२०२४

निविदा धारकाचे नाव –

पत्ता – ________________________

______________________________

______________________________

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रपत्र अ प्रमाणे सर्व दर GST वगळून द्यावेत. |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडकरीता कार्यालयीन कामकाजासाठी तीन स्विफ्ट डिझायर अथवा तत्सम (A/C) व एक इनोव्हा (A/C) वाहने भाडेतत्त्वावर पुरविणे बाबत..<br>(GST वगळून दर द्यावेत.) | प्रपत्र अ प्रमाणे सर्व दर GST वगळून द्यावेत. |

निविदा धारकाची सही व शिक्का

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.**
**चिंचवड – ४११ ०१९**

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड

चिंचवड – ४११ ०१९

**ई-निविदा सूचना क्र.०१ सन २०२४-२५**

**प्रपत्र अ**

---

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. करीता कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडेतत्त्वावर पुरवठा करणे

| **अ. क्र.** | **तपशिल** | **दर र.रू. (GST वगळून दर द्यावेत)** | |
|---|---|---|---|
| | | **स्विफ्ट डिझायर** | **इनोव्हा क्रिस्टा** |
| **स्थानिक (पुणे-पिंपरी चिंचवड)** | | | |
| i) | प्रतिदिन प्रति वाहन ८० किमीसाठीचा दर | | |
| ii) | प्रतिदिन ८० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी साठीचा दर | | |
| iii) | ४० कि.मी. पर्यंत (पुणे विमानतळ) टोल पार्किंग सह दर | | |
| iv) | ४० कि.मी. नंतर पुढील प्रत्येक कि.मी. साठीचा दर | | |
| **इतर शहरांसाठी** | | | |
| i) | प्रतिदिन प्रति वाहन १५० किमीसाठीचा दर (Including Night Hault) | | |
| ii) | प्रतिदिन १५० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी साठीचा दर | | |
| iii) | २५० कि.मी. पर्यंत इतर शहरासाठी टोल पार्किंग सह दर (Including Night Hault) | | |
| iv) | २५० कि. मी. नंतर पुढील प्रत्येक कि.मी. साठीचा दर | | |
| **मुंबईसाठी** | | | |
| i) | ३६० कि.मी. पर्यंत (मुंबईसाठी) टोल पार्किंग सह दर (Including Night Hault) | | |
| ii) | ३६० कि. मी. नंतर पुढील प्रत्येक कि.मी. साठीचा दर | | |

**सही/-**

**(शेखर सिंह)**

मुख्य कार्यकारी अधिकारी

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.

चिंचवड – ४११ ०१९

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड

चिंचवड – ४११ ०१९

**ई-निविदा सूचना क्र.०१ सन २०२४-२५**

---

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडकरीता कार्यालयीन कामकाजासाठी वाहन सेवा मासिक भाडेतत्त्वावर पुरवठा करणेबाबत किमान १२ महिने कालावधीकरीता नोंदणीकृत अनुभवी वाहतूक व्यावसायिकांकडून ई-निविदा दोन लिफाफा (Two Envelope System) पद्धतीने दर मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | अंदाजित निविदा र. रू. | बयाणा र.रू. | अनामत र.रू. | कामाचा कालावधी | निविदा फॉर्म फी परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड करीता कार्यालयीन कामकाजासाठी तीन स्विफ्ट डिझायर अथवा तत्सम (A/C) व एक इनोव्हा (A/C) वाहने भाडेतत्त्वावर पुरविणे बाबत.. (GST वगळून दर द्यावेत.) | ३३,८६,०००/- | ३३,८६०/- | १,६९,३००/- | किमान १२ महिने | ३११९/- +१८% GST (५६२/-) ३६८१/- |

## <u>अटी-शर्ती</u>

१. सदर निविदेतील कामाचा तपशील, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी-शर्ती निविदा शेडयुल इत्यादींची माहिती स्मार्ट सिटी लिमिटेड www.smartpcmc.org व www.pcmcindia.gov.in या वेबसाईटर उपलब्ध आहे. याकामी पुरवठाधारकांनी www.mahatender.gov.in या संकेतस्थळाद्वारे सेल्फ रजिस्ट्रेशन नोंदणी करणे आवश्यक आहे. सदरची निविदा फक्त ई-टेंडरींग प्रक्रियेअंतर्गत दि.०२/१२/२०२४ ते दि.१७/१२/२०२४ अखेर दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई-टेंडरीग पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णत: किंवा अंशत: मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड, चिंचवड, यांनी स्वत:कडे राखून ठेवलेला आहे. सदरची निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर भरता येईल.

२. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड करीता कार्यालयीन कामाकरीता वाहने भाडेतत्त्वावर घेणेकामी सदरची निविदा दोन लिफाफा (Two Envelope System) पद्धतीने ई-निविदा आहे. लिफाफा क्र.०१ (तांत्रिक लिफाफा) या मध्ये पुढील कागदपत्रांचा समावेश राहिल.

अ. शॉप ॲक्ट परवाना / नोंदणी

आ. PF / ESI नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत भरणा चलन (लागू असलेस)

इ. पॅन कार्ड

ई. GST प्रमाणपत्र

उ. तीन वर्षाचा आयकर भरत असलेला पुरावा (I.T.R.) (२१-२२, २२-२३, २३-२४)

ऊ. पुरवठाधारकांनी मागील तीन वर्षाची सरासरी उलाढाल किमान र.रू.१०,००,०००/- असल्याबाबत सनदी लेखापाल प्रमाणपत्र (२१-२२, २२-२३, २३-२४)

ऋ. पुरवठाधारकाचे स्वत:च्या मालकीची किमान पाच प्रवासी वाहने असणे आवश्यक आहे. सोबत वाहन नोंदणी प्रमाणपत्र, विमा भरल्याबाबतचे पत्र.

ॡ. निविदा भरताना निविदा धारकाकडे शासकीय/निमशासकीय संस्थेकडील प्रपत्र अ मधील कोणतेही प्रकारची वाहने पुरवठा केलेचा किमान ३ वर्षाचा अनुभव दाखला/पुरवठा आदेश/कामकाज आदेश सादर करणे बंधनकारक राहील.

ऍ. निविदा धारकाचे नाव काळ्या यादीत (Black list) नसलेबाबत अथवा निविदा धारकावर कोणताही गुन्हा नोंदविला गेला नसलेबाबत अथवा स्मार्ट सिटी कंपनीचे मा.संचालक मंडळाचे सदस्य यांचेशी संबंधित नसलेबाबत स्व:स्वाक्षांकित प्रमाणपत्र.

ऐ. निविदा सोबत कागदपत्रांच्या स्व:स्वाक्षांकित प्रती निविदेच्या अंतिम तारखेनंतर ७२ तासाचे आत सादर करणे आवश्यक राहिल, अन्यथा निविदा उघडली जाणार नाही.

वरील कागदपत्रे परिपूर्ण असलेले निविदा धारक लिफाफा क्र.०२ उघडण्यास पात्र ठरतील.

३. निविदा दराचा ग्राह्यता कालावधी १२० दिवस राहील. परंतू अपवादात्मक परिस्थिती उद्भवलेस ग्राह्यता कालावधी वाढविणेबाबत विभागप्रमुख व त्यांचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी विचारणा केल्यास ग्राह्यता कालावधी वाढवून द्यावा लागेल.

४. पुरवठा धारकाने आपले दर प्रपत्र 'अ' प्रमाणे इंधनासह देणे आवश्यक आहे.

५. पुरवठाधारकाने वाहने १२ तासांसाठी भाड्याने देणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यकता भासल्यास यापेक्षा जास्त वेळेकरता वाहन पुरविणे बंधनकारक राहील. कामकाजाची वेळ कार्यालयाच्या सोईनुसार ठरविणेत येईल.

६. स्मार्ट सिटीमार्फत बुक केलेले वाहन अपरिहार्य कारणांमुळे रद्द केल्यास प्रति दिवसाच्या मंजूर दरापैकी पन्नास टक्के (५०%) रक्कम अदा केली जाईल.

७. अटीयुक्त निविदा स्विकृत करता येणार नाही.

८. निविदा धारकाने निविदेमधील आवश्यक वाहने मागणीनुसार पुरवठा करणेबाबत हमीपत्र स्वत:चे लेटर हेडवर लिहून देणे बंधनकारक राहील. तसेच पुरवठा करावयाची सर्व वाहने टुरिस्ट (Tourist) परवाना (पिवळया नंबरप्लेट) असलेलीच पुरविणे बंधनकारक राहील.

९. स्वीकृत केलेल्या निविदा धारकाचे पुणे अथवा पिंपरी चिंचवड परिसरात कार्यालय असणे आवश्यक आहे. तसेच याकामी आवश्यक स्टाफ निविदाधारकाकडे असणे आवश्यक आहे.

१०. निविदा दर मंजूर केलेनंतर निविदा कालावधीत शासनाने केलेली कोणतीही करवाढ किंवा इंधनवाढ मंजूर केली जाणार नाही.

११. हलके संवर्गातील वाहने पाच वर्षापेक्षा जास्त जुनी नसावीत.

१२. पुरवठा धारकाने कामगार कायदे व नियम वाहन चालकांचे बाबतीत सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील. याबाबत पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१३. आदेशामध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून तसेच वाहनाच्या संख्येनुसार त्वरीत वाहनांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. वाहनांचा यंत्रणेचा पुरवठा केला नाहीतर व त्याकामी ठेकेदाराने मुदतवाढीची मागणी केलेनंतर त्यांना मुदतवाढ देणे अथवा न देणे याचा अधिकार करारनामा करून घेणार यांना राहील.

१४. पुरवठा धारकाने वाहन न पुरविलेस आणि अश्या परिस्थितीत कार्यालयास दुसरीकडून वाहन भाड्याने द्यावे लागल्यास, अशा भाड्याने वाहन घेतल्यापोटी अदा करावी लागलेली रक्कम संबंधित पुरवठाधारकाकडून र.रू.५००/- प्रती दिन दंड आकारणी करून वसूल केली जाईल. सदर वाहनांची दुरूस्ती व देखभाल स्वखर्चाने नियमित व तात्काळ विनाविलंबित करून देणे आवश्यक आहे. दुरूस्तीसाठी वाहन थांबविलेस अन्य वाहनांची व्यवस्था करून देणे बंधनकारक आहे.

१५. पुरवठा धारकाने वाहनाचे / चालकाचे सर्व कागदपत्रे जसे वाहन चालविण्याचा परवाना, नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, चालकाची अनुज्ञप्ती इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.

१६. मंजूर पुरवठा धारकाने नेमणूक करणेत आलेल्या वाहन चालकाचे ओळखपत्र पुरविणे बंधनकारक राहील.

१७. पुरवठा धारकाने नेमणूक करणेत आलेल्या वाहन चालकाबाबत तक्रार आलेस तात्काळ बदली वाहन चालक पुरविणे बंधनकारक राहील.

१८. निविदेची मुदत १२ महिनेची असली तरी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. केव्हाही काम बंद करू शकेल व निविदेचा कालावधी संपुष्टात आणेल. याबाबतचा अंतिम अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. यांचा राहील.

१९. निविदा धारकाने पुरविणेत येणाऱ्या वाहनांचे वाहन चालकासोबत/वाहनासोबत मोटार सारथीकडे आर.टी.ओ. चे पक्के ड्रायव्हींग लायसन्स, टुरिस्ट वाहनांचे आर.सी.टी.सी., इन्शुरन्स, टुरीस्ट परवाना इत्यादी कागदपत्रे सतत जवळ बाळगणे बंधनकारक राहील.

२०. गाडीला / वाहनास अपघात झाल्यास ड्रायव्हर व आमच्या कार्यालयाकडील अधिकारी, पदाधिकारी, सेवक, कर्मचारी तसेच त्रयस्थ वाहन अगर व्यक्ती, पादचारी यांना विमा मिळवून देणेची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील. पुरवठा करणेत आलेल्या सर्व वाहनांचा संपूर्ण विमा (Comprehensive insurance) उतरविणे बंधनकारक राहील.

२१. निविदा मंजुर पुरवठाधारकास भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ च्या कलमातील तरतूदींची पूर्तता करणेची जबाबदारी ठेकेदार / संस्था यांची राहील.

२२. निविदा मंजुर पुरवठाधारकास १२ महिन्याच्या एकूण निविदा रकमेच्या ५% प्रमाणे येणाऱ्या रक्कमेचा अथवा राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे पिंपरी चिंचवड शाखेचा एफ.डी.आर. स्वरूपात स्वतंत्र सादर करावा लागेल.

२३. प्रथमता मंजूर केलेले दर एक वर्षासाठी राहतील. जर आवश्यकता भासली तर सदरची मुदत पुढील दोन वर्षांपर्यंत कालावधीसाठी पुरवठादाराचे कामकाज समाधान कारक असलेस वाढविले जातील.

२४. निविदा मंजुर धारकास निविदा रक्कमेतील पहिल्या १० लाखपर्यंत र.रू.५००/- व पुढील प्रत्येक १ लाखा करीता र.रू.०.१% प्रती वर्षा प्रमाणे येणाऱ्या रक्कमेच्या स्टँम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल. मुदतील स्वखर्चाने करारनामा करून न दिल्यास अथवा करारनामा देणेस टाळाटाळ करत असलेचे निदर्शनास आलेस निविदा रद्द करणेत येईल.

२५. पुरवठा धारकास आदेशात नमुद केलेल्या ठिकाणी वाहने पुरवावी लागतील.

२६. पुरवठा धारकाकडून उपलब्ध करून देणेत येणाऱ्या वाहनाचे स्पिडो मिटरवरील रिडींग PCMC HO/PCSCL Office पासून गृहीत धरणेत येईल.

२७. पुरवठा धारकाने दररोज काम सुरू करणेपुर्वी व कामकाज संपल्यानंतर प्रत्येक वाहनाचे स्पिडो मिटरवरील रिडींग संबंधित अधिकारी यांना दाखवून लॉग बुकमध्ये नोंदी करून त्यावर संबंधित अधिकारी यांची रोजच्या रोज स्वाक्षरी घेणे व शिफारशीसह बील दोन प्रतीत सादर करावयाची आहेत.

२८. निविदा मंजुर झालेस पुरवठाधारकाने दर मंजुरी बाबत या कार्यालयातून पत्र मिळाले पासून सात दिवसाचे आत करारनामा करने बंधनकारक राहिल. करारनामा शासन नियमाप्रमाणे विहित रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक राहिल. मुदतीत करारनामा न केलेस निविदा रद्द करून बयाणा रक्कम जप्त करणेत येईल.

२९. सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दु.४.०० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवेल त्या दिवशी व वेळेत निविदा उघडण्यात येईल. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार अथवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

३०. निविदा मंजुर पुरवठा धारकाने वाहने पुरविणेस असमर्थता दर्शविल्यास किंवा वाहनांचा पुरवठा अर्धवट केल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्यांनी त्या कामापोटी भरलेली अनामत रक्कम जप्त करून पुरवठा आदेश रद्द करणेत येईल. निविदा धारकाचे नाव काळया यादीत समाविष्ट करणेत येईल.

३१. निविदा मंजुर पुरवठा धारकाने निविदेसोबत / ठेकेदार नोंदणी अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे अवैध, अपुर्ण किंवा दिशाभूल करणारी असलेस, तसेच करारनामा करणेस पाचारण केले असता करारनामा करणेस टाळाटाळ केलेस किंवा करारनामा करणेस असमर्थता दर्शविलेस, तसेच वाहनांचा पुरवठा अर्धवट केलेस सदर कामापोटी जमा केलेली बयाणा, अनामत रक्कम जप्त करून पुरवठा आदेश रद्द करणेत येईल. अशा निविदाधारकावर शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील दि.०१/१२/२०१६ अन्वये पुढील कारवाई करणेत येईल.

३२. शासन व स्मार्ट सिटी लि. लेखापरिक्षणात भविष्यात काही त्रुटी अथवा आक्षेप आढळल्यास त्याची पूर्तता करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

३३. प्रस्तुत ई-निविदा संदर्भात काही वाद उपस्थित झाल्यास अशा वादात अंतिम निर्णय देणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. हे लवाद म्हणून काम पाहतील व त्यांचा या संदर्भातील निर्णय अंतिम राहील. तसेच तो निविदाधारकांवर बंधनकारक राहील. न्यायालयीन बाब उदभवल्यास पिंपरी न्यायालय कार्यक्षेत्र राहील.

३४. निविदा मध्ये नमुद वाहनांची संख्या कमी/जास्त बदल होऊ शकतो. पुरवठा धारकास मंजूर दरानेच वाहने पुरवावी लागतील, त्याकरीता जादा दराची मागणी करता येणार नाही.

३५. निविदा मंजुर पुरवठाधारकाने मंजूर (६+१) आसन क्षमतेचे वातानुकुलित वाहन व (४+१) आसन क्षमतेचे वातानुकुलित वाहन पुरविणे बंधनकारक आहे.

३६. निविदाधारकावर निविदेतील, करारनाम्यातील पुरवठा आदेशातील सर्व अटी शर्ती बंधनकारक राहतील, यापैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास निविदा धारकाचे बयाणा/अनामत रक्कम जप्त करून पुढील योग्य ती नियमाधीन कार्यवाही करणेत येईल.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.**
**चिंचवड – ४११ ०१९**